प्रेस नोट दिनांक :— १७/१०/२०२२

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती |
| २ | आरोपीचे नाव, हुद्दा, वर्ग व कार्यालयाचा पत्ता | १) श्री.शंकर महादेवराव श्रीराव, वर्ग–२, वय ५४ वर्ष, पद– नायब तहसिलदार (महसुल) अचलपुर ता. अचलपुर जि. अमरावती. |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ व ठिकाण | १७.१०.२०२२ चे १८/१० वा. ते १८/२१ वा. दरम्यान |
| ४ | मागणी केलेली रक्कम | २०,०००/— रूपये, तडजोडीअंती १८,०००/— रूपये |
| ५ | स्विकारलेली लाच रक्कम | १८,०००/— रूपये. |
| ६ | घटनास्थळ | नायब तहसिलदार यांचे न्यायालय कक्षमध्ये,तहसिल कार्यालय, अचलपुर ता.अचलपुर जि. अमरावती. |

यातील तक्रारदार यांनी दिनांक ०७/१०/२०२२ रोजी कार्यालयात येवुन तक्रार दिली की, तक्रारदार यांचे ट्रक क्रमांक एम.एच. २७ बी.एक्स.४९३७ हा रेतीने भरलेला ट्रक लोकसेवक नायब तहसिलदार श्री.शंकर महादेवराव श्रीराव, अचलपुर तहसिल जि.अमरावती. यांनी दिनांक ०२.१०.२०२२ रोजी महालक्ष्मी काटयाजवळ अचलपुर येथे थांबवला. व सदर ट्रक वर कार्यवाही न करण्याकरीता २०,०००/— रूपये लाचेची मागणी केली. व नंतर आणुन देण्याच्या अटीवर ट्रक सोडला. अशी लेखी तक्रार दिली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने दि. १७/१०/२०२२ रोजी पंचासमक्ष केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार यांचा दिनांक ०२.१०.२०२२ रोजी महालक्ष्मी काटयाजवळ अचलपुर येथे थांबवीलेला ट्रक वर कार्यवाही न करता सोडल्याबद्दल मोबदला म्हणून २०,०००/— रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती १८,०००/— रूपये लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.

वरून दिनांक १७/१०/२०२२ रोजी पंचासमक्ष आयोजित सापळा कारवाई दरम्यान आलोसे श्री.शंकर महादेवराव श्रीराव, अचलपुर तहसिल जि. अमरावती. यांना तक्रारदार यांचेकडून लाचेची रक्कम रूपये १८,०००/— पंचासमक्ष स्विकारली वरून आज रोजी आलोसे यांना ताब्यात घेण्यात आले असुन त्यांचेविरूध्द गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा.श्री.विशाल गायकवाड, पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, मा.श्री.अरुण सावंत, अपर पोलीस अधीक्षक, मा.श्री.देविदास घेवारे, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, मा.श्री.संजय महाजन, पोलीस उप अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती, श्री.एम.एस.भगत, पोलीस उप अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.प्रविणकुमार पाटील,पो.नि.अमोल कडू, पो.नि. केतन मांजरे, पो.ना. राहुल वंजारी, पो.ना.विनोद कुंजाम, पो.कॉ. शैलेश कडू ,चालक पो.उप.नि.सतीश किटकूले, यांनी पार पाडली.

नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारा संबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

संपर्क: ॲन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती.
ऑफीस फोन नं.०७२१–२५५२३५५,२६६४९०२
टोल फ्रि नंबर — १०६४

(प्रविणकुमार पाटील)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
अमरावती
मो.नं. ९८५००७०५०४